 

# कोंबड्यांच्या खाद्यातील महत्त्वाचे घटक

कुक्कुटपालन व्यवसायात महत्त्वाचा खर्च हा खाद्यावर होतो. खाद्याचा परिणाम पक्ष्यांच्या वाढीवर होतो. यामुळे पक्ष्यांच्या खाद्यावर विशेष लक्ष देणे महत्त्वाचे आहे. कोंबड्यांच्या शरीरात ६६ टक्के पाणी, २१ टक्के प्रथिने, नऊ टक्के चरबी, चार टक्के खनिजे आणि बरेच घटक असतात, त्यामुळे ते घटक त्यांना खाद्यातून मिळाले पाहिजेत. म्हणून खाद्य बनवताना या सर्व गोष्टींचा विचार करून पक्ष्यांना योग्य प्रमाणात 'संतुलित आहार' द्यावा. खाद्य बनविताना पुढील घटकांचा समावेश असावा.

**कार्बोहायड्रेट :** याद्वारे कोंबड्यांच्या शरीरात उष्मा आणि शक्ती निर्माण होते. हा घटक मका, तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी आणि त्यापासून बनविलेले इतर पदार्थ यांपासून कोंबड्यांना मिळतो. कोंबड्यांच्या खाद्यात त्याचे प्रमाण ७५ ते ९० टक्के एवढे असावे.

**प्रथिने :** प्रथिनांमुळे कोंबड्यांची वाढ चांगली होते, अंडी आणि मांस उत्पादन वाढते. हा घटक शेंगदाणा ढेप, सोयाबीन ढेप, मासळीचा चुरा, रक्ताची भुकटी, सूर्यफूल ढेप, मोहरी ढेप इत्यादींपासून मिळतो. कोंबड्यांच्या खाद्यात त्याचे प्रमाण १६ ते २२ टक्के एवढे असावे.

**स्निग्ध पदार्थ :** यामुळे कार्बोहायड्रेट घटकाच्या अडीचपट उष्मा निर्माण होतो. हा घटक म्हणजे वेगवेगळी तेले किंवा चरबी होत. हा घटक अतिशय कमी प्रमाणात लागतो.

**खनिज पदार्थ :** हाडे आणि अंड्यांचे कवच इत्यादी बऱ्याच अवयवांची निर्मिती याद्वारे सुलभ होते. कोंबड्यांच्या शरीराला कॅल्शिअम, फॉस्फरस, सोडिअम, पोटॅशियम, मॅंगनीज, कॉपर, कोबाल्ट, आयोडीन, सेलेनियम, क्लोरिन, मॉलिब्डेनम, मॅंगनीज इत्यादी खनिजांची आवश्यकता असते. हा घटक कोंबड्यांना चुनखडी, हाडांची भुकटी, शंख शिंपले, डाय-कॅल्शिअम फॉस्फेट, मिनरल मिक्स्चर यांमधून मिळू शकतो.

**जीवनसत्त्वे :** ए. डी, ई, के ही जीवनसत्त्वे पाण्यात न विरघळणारी असून, बी, सी पाण्यात विरघळतात. हे घटक पक्ष्यांना जीवनसत्त्वांच्या तयार मिश्रणातून मिळू शकतात.

**इतर :** ग्रोथ प्रमोटर, प्रतिजैविके, बुरशी प्रतिबंधके, कोलिन क्लोराईड, रक्ती हगवण प्रतिबंधके आपणास खाद्यातून पुरवावी लागतात.

**पाणी :** स्वच्छ आणि शुद्ध पाण्याचा पुरवठा करावा.

**पिल्लांना आणि ग्रोवरला खाद्यपुरवठा :**

यात खाद्य देण्याच्या प्रामुख्याने दोन पद्धती आहेत, त्यातील पहिल्या पद्धतीत पक्षी खाईल तेवढे खाद्य देणे आणि दुसऱ्या पद्धतीत वाढत्या पक्ष्यांसाठी २० टक्क्यांपर्यंत खाद्य कमी द्यावे. जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्याच्या दृष्टिकोनातून खाद्यपुरवठा करावा.

**लेअर पक्ष्यांना खाद्यपुरवठा :**

सुरवातीच्या काळात अंडी उत्पादन वाढत असल्यामुळे त्यांचे खाद्य खाण्याचे प्रमाण वाढत जाते. कोंबड्यांचा अंडी देण्याचा काळ हा त्यांच्या वयाच्या विसाव्या आठवड्यापासून धरला जातो. अंड्यांचे उत्पादन आणि त्यांचे योग्य वजन वयाच्या २४ व्या आठवड्यात येते. या काळात पक्ष्यांची कॅल्शिअमची गरज वाढलेली असते. वयाच्या २० ते ४० आठवड्यांमध्ये पक्ष्यांना योग्य प्रमाणात खाद्य घटक द्यावेत. ४० व्या आठवड्यानंतर प्रथिने थोड्या कमी प्रमाणात दिली तरी चालतात. पक्ष्यांच्या जातीनुसार त्यांच्या खाद्याच्या गरजा बदलतात, त्यामुळे आवश्यकतेनुसारच खाद्य द्यावे. खाद्य देताना नेहमी वातावरणाचा व पक्ष्याच्या वयाचा विचार करावा. ब्रॉयलर पक्ष्यांसाठी वातावरणातील बदलांनुसार पक्ष्यांच्या खाद्यामध्ये बदल करावेत.


प्रकाशन

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**



www.mafsu.in

www.knpcvs.in

✻ मार्गदर्शक ✻

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✻ संकलन ✻

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.